N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** लोणावळा शहर

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0288 **Year (वर्ष):** 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ): 17/11/2026 10:20

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

Time Period (कालावधी): पहर 6

Date From (दिनाक पासून): 16/11/2026

Date To (दिनाक पर्यंत): 16/11/2026

Time From (वेळेपासून): 17:02 बजे

Time To (वेळेपर्यंत): 18:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिनाक): 17/11/2026 **Time (वेळ):** 10:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**

Entry No. (नोंद क्र.): 007

Date & Time (दिनाक आणि वेळ): 17/11/2026 09:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लोणावळा ग्रामीण पोस्टे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मिथुन दत्तात्रय म्हात्रे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुण,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुण,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9637577154

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	नाथा रामकिसन केकाण पोलीस उप निरीक्षक			1. लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन,लोणावळा शहर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

Scanned with CamScanner

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., If any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद
लोणावळा शहर
पोलीस स्टेशन
तारीख-17/11/2026

मी मिथुन दत्तात्रय म्हात्रे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे मो.नं. 9637577154.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे दि.29/07/2026 पासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.16/11/2026 रोजी 12.45 वा. मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार महेश भिमराव पवार, वय-33 वर्षे, व्यवसाय-रियल इस्टेट, रा. फ्लॅट नं.2, जास्मीन अपार्टमेंट, स्वराज नगरी, तळेगांव दाभाडे (स्टेशन), ता.मावळ, जि.पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा, असे आदेशित केले. व सदर कारवाई करीता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयातील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. तसेच पडताळणी व सापळा कारवाईकरिता अंमलदार व चालक देखील पाठविले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यांनतर 15.00 वा चे सुमारास पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात हजर झाले, त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे पंच 1)श्री.पराग राजु जगताप वय-33 वर्षे, पद-कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम पुर्व विभाग, पुणे मो.नं.7875410143, रा. फ्लॅट क्र.3, निशिंगध बिल्डींग, 15 राणीचा बाग, सार्वजनिक बांधकाम विभाग वसाहत, पुणे, पंच 2) श्री.संजय ओमप्रकाश हस्तोलीया, वय-46 वर्षे, पद-कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम पुर्व विभाग,पुणे, रा. डी/6-701, इको व्हॅली, कान्हेफाटा, ता.मावळ, जि.पुणे मो.क्र.8767804051 असे सांगितले. त्यांची तक्रारदार महेश पवार व सापळा पथकातील अंमलदार मपोहवा/7901 गोरे, पोशि/95 रवि दिवेकर, चालक पोहवा/6894 सोनावणे, यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली तसेच स्वहस्ताक्षरात लिहून दिली. ती पुढीलप्रमाणे,

"मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबीयांसह राहण्यास असुन माझे लक्ष्मी रियल इस्टेट नावाने जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. माझा भाऊ शकर उर्फ अमित भिमराव पवार, वय-30 वर्षे यांचे विरुध्द तक्रारदार सागर हिवाळे यांनी दिलेल्या तक्रारी वरुन लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रं.230/2026 भारतीय न्याय संहीता कलम 109(1), 352, 3(5) अन्वये गुन्हा दि.02/10/2026 रोजी दाखल केला आहे. नमुद गुन्हयाचा तपास नाथा केकान, पिएसआय, नेमणुक लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन हे करीत आहेत. नमुद गुन्हयामध्ये माझा शंकर उर्फ अमित भिमराव पवार यास अटक होवुन जामीन मिळालेला आहे. भावास जामीन मिंळाल्यानतर गुन्हयाचा तपास सुरु आहे तसेच चॅप्टर कारवाई करण्याचे काम सुरु आहे. माझ्या भावास दिंनाक 03/10/2026 रोजी अटक करण्यात आली होती त्यानंतर मी त्याच दिवशी संध्याकाळी मी लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन येथे जावुन नाथा केकान, पिएसआय यांना भेटलो होतो तेव्हा त्यांनी माझे भावावर लावलेल्या गुन्हयात 307 चे कलम कमी करुन 326 (जिवे ठार मारण्याचे कलम कमी करुन गंभीर दुखापतीचे कलम लावतो) तसेच त्याला मारहाण करणार नाही, जामीन होण्यास मदत करतो असे सांगुन त्यांनी माझेकडे 5 लाख रुपये मागणी केली होती त्यानंतर तडजोडीनंतर 1 लाख रुपये नाथा केकान, पिएसआय यांनी माझेकडे मागीतले होते. त्यानंतर मी त्याच दिवशी राग्री 09/00 वाजण्याचे सुमारास लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन परिसरात नाथा केकान, पिएसआय यांनी त्यांचे किया सेल्टॉस गाडीमध्ये माझेकडुन 50,000 रु. स्विकारले आहेत. त्यानंतर दिंनाक 04/11/2026 रोजी दुपारी

Scanned with CamScanner

12/00 वाजण्याचे सुमारास नाथा केकान, पिएसआय माझे घरी येवुन माझे घरातील हॉलमध्ये येवुन त्यांनी माझेकडुन 50,000 रु. घेवुन गेले आहेत. त्यानंतर दिनाक 06/11/2026 रोजी दुपारी 03/30 वाजण्याचे सुमारास त्यांनी कोर्टाच्या आवारात माझकडुन 20,000 रु. स्वत:करीता व 10,000 आरोपी पार्टीकरीता देण्यास सांगीतले होते. त्यानंतर दिनाक 30/10/2026 रोजी जामीन मिळालेला आहे. माझ्या भावाला कोर्टाचे आदेशाने पोलीस स्टेशन येथे हजेरी लावलेली आहे.

दि.14/11/2026 रोजी नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुशंगाने माझा भाऊ शंकर उर्फ अमित भिमराव पवार हजेरी लावण्याकरीता लोणावळा पोलीस स्टेशन येथे गेला होता त्यानंतर नाथा केकान, पिएसआय यांनी त्यांचे मोबाईल नंबर 9421049623 यावरुन माझे मोबाईल नंबर 9762262525 यावर व्हॉटसअँप कॉल केला व त्यांनी सांगीतले की, तुमच्या भावावर चॅप्टर केस करण्यासाठी मदत करण्यासाठी व गुन्हयातील उर्वरीत तपासात मदत करुन चार्जशिट लवकर दाखल करण्यासाठी 30,000 रु. पैसे मागणी केली आहे त्या व्हॉटसअँप कॉलची मी माझेकडील दुस-या मोबाईल ने शुटींग केली आहे. माझ्याकडे वरीलप्रमाणे पैशांची मागणी केलेली आहे. नाथा केकान, पिएसआय यांनी मागणी केलेली रक्कम हि गुन्हयातील रक्कम नसुन माझे व त्यांचे कोणतेही आर्थीक व्यवहार नाही त्यांनी मागणी केलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याने त्यांचेविरुध्द कारवाई होणेस विंनती आहे". अशा आशयाचा लेखी अर्ज दिला आहे.

त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनाक 16/11/2026 रोजी तक्रारदार यांना पीएसआय नाथा केकाण यांनी लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन येथे बोलावले असलेने व तक्रारदार त्यांची भेट घेवुन बोलणी करणार असलेने दिनाक 16/11/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरिवण्यात आले. त्यानंतर पुढील कारवाई लोणावळा येथ जाऊन करु असे तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितले.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे लाप्रवि कार्यालयात उपलब्ध असलेल्या सरकारी वाहन स्कॉर्पीओ कार क्रमांक एम.एच.12/व्ही.जी/9264 हीचे मध्ये सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्य, प्रिंटर, लॅपटॉप, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्प, काळा कपडा, सील साहीत्य ईत्यादी सर्व आवश्यक साहीत्य ठेवण्यात आले. त्यानंतर मी सोबत पंच, मपोहवा/7901 गोरे, पोशि/95 रवि दिवेकर, चालक पोहवा/6894 सोनावणे, असे सरकारी वाहनात बसलो. तक्रारदार हे त्यांचे स्कॉर्पीओ कार क्रमांक. एम.एच. 14/एम.सी./4387 यामध्ये बसुन आमचे मागोमाग लाप्रवि कार्यालयातुन निघाले. तेव्हा 15.20 वाजले होते. दोन्ही वाहने साधु वासवानी चौक- खडकी, देहु, तळेगांव दाभाडे, वडगांव मावळ, लोणावळा येथे रोडचे मॅप्रो गार्डन पार्कीग समोर रोडच्याकडेला थांबलो ती वेळ 16.50 वा. ची होती.

त्यानंतर मी तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी कारवाई करावयाची असल्याचे सांगुन तक्रारदार व पंचांचे निवेदन घ्यावयाचे असलेचे सांगुन आमच्याकडील शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर बाजुस EVM Elite 32 GB C10 Micro SD Card दुसरे बाजुस CE MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TaIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री महेश पवार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदनाचे चित्रीकरण व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन शासकीय सोनी कपंनीचा व्हिडीओ कॅमेरा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर MROCK 16 GB Micro SD HC I C10 व मागील बाजुस MR-K06/26 CE MMC16GB7THL छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली व तो मपोहवा/गोरे यांचे ताब्यात देवुन रेकॉर्डिगबाबत सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले. त्याचे मपोहवा/ गोरे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले. तेव्हा 16.58 वाजले होते.

त्यानंतर पडताळणी पंचनाम्याच्या अनुशंगाने तक्रारदार व पंचांना पुन्हा एकदा पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पोशि/रवि दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार

Scanned with CamScanner

श्री महेश पवार यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. महेश पवार व पंच क्र. 1 श्री. जगताप यांना तक्रारदार यांचे स्कॉर्पीओ कार क्रमांक. एम.एच. 14/एम.सी./4387 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय नाथा केकान यांचेशी बोलणी करण्याकरिता लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन येथे रवाना केले. ती वेळ 17:20 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक मॅप्रो गार्डन, जुना मुंबई पुणे हायवे समोरील पार्कींग परिसरात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले. पोशि/रवि दिवेकर यांनी तक्रारदार यांचेडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. तेव्हा 18.05 वाजले होते. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री पराग जगताप यांना पंच क्र 02 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री पराग जगताप यांनी सांगितले कि, "मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या स्कॉर्पीओ कार वाहनामधुन लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गेलो. सदर वेळी लोकसेवक श्री.केकाण, पोलीस उप निरीक्षक हे पोलीस निरीक्षक यांचे केबीन मध्ये असल्याचे दिसले. त्यामुळे आम्ही थोडा वेळ त्यांचे केबीन चे बाहेर थांबुन राहीलो. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक केकाण हे त्यांचे केबीन मध्ये आले. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे केबीन मध्ये बोलावलेने मी व तक्रारदार त्यांचे केबीन मध्ये गेलो व त्यांचे टेबल समोरील खुर्चीवर बसलो. सदर वेळी तक्रारदार व लोकसेवेक पीएसआय केकाण यांचे मध्ये तक्रारदार यांचा भावाविरुध्द दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान लोकसेवक पीएसआय केकाण हे तक्रारदार यांना "गणेश भाउंनी शॉट काय केली, डिवाएसपी माने साहेब आले होते, त्यावर तक्रारदार "हा" असे म्हटले, त्यावर लोकसेवक केकाण हे " माने साहेबांना जाता जाता सहज भेटले, आणि केकाण साहेबांना भेटले म्हटले, एक लाख दिले". असे बोलेले, त्यावर तक्रारदार "असे बोलले ?, त्यावर लोकसेवक "हा" त्यावर तक्रारदार "बर" असे म्हटले, त्यावर लोकसेवक केकाण यांनी " 1 लाख दिले म्हणजे, याच गुन्हयातले हेच का ते, असे माने साहेब म्हटले, हयाच गुन्हयातलेच 307 चे 1 लाख रुपये" असे म्हटले,त्यावर तक्रारदार यांनी "हं" "म्हणजे आपल्या गुन्हयातले घेतले ते" असे विचारले तेव्हा लोकसेवक यांनी "हा, हा" असे म्हणाले, त्यावर तक्रारदार यांनी "हा, हा" असे बोलले. त्यानंतर लोकसेवक यांनी " घेतले, आता ऑलरेडी घेतले होते, साहेबांना वाटलं काय अजुन कुठं 1 लाख रुपये दुस-या पार्टीकडुन घेतले होते काय?", त्यावर तक्रारदार हे "हा साहेब, पण आता आधिचे 1 लाख, अजुन 30 हजाराचा माझ्यावर ठेका नका देवु, माझे सध्या लई व्यवहार लई शांत आहेत " असे म्हणाले, त्यावर लोकसेवक "तुम्हाला काय दयायचे आहे, ते दया" असे म्हटले, त्यावर तक्रारदार हे "बोला की, असे म्हणाले, त्यावर लोकसेवक यांनी " हे हे काय, असे म्हटले असता, तक्रारदार हे "20 हजार, 20 हजार असे म्हणाले, त्यावर लोकसेवकाने "हा.. बास" असे म्हटले. त्यानंतर तक्रारदार हे " आलो एक पाच मिनीटात" असे म्हणाले असता, लोकसेवक यांनी त्यांचेकडील दोन खाकी पाकीट तक्रारदार यांना दिले. त्यानंतर लोकसेवक यांने " हयाच्यात 15 टाका, अन् 5 हयाच्यात टाका" असे म्हटले, त्यावर तक्रारदार हे "बर ठिक आहे, तुमचं करा इथ, लई गर्दी दिसतेय, तुम्हाला म्हणजे 15 हयाच्यात 5 हयाच्यात असे म्हणाले त्यावर लोकसेवक हे "हो, हो" असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी आलो मी असे म्हटले व मी व तक्रारदार व आम्ही दोघे सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो".अशी हकीगत पचांसमक्ष सांगितली.

त्यांनतर तक्रारदार श्री महेश पवार याना पंचसमक्ष रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी सुध्दा पंच क्र.01 श्री पराग जगताप यांचेप्रमाणेच मिळतीजुळती हकिगत सांगुन तक्रारदार यांनी सांगितले की, पंच हे सुध्दा लोकसेवक यांचे टेबलसमोर बसलेले असल्याने पंचांनी आमचे मध्ये झालेले संभाषण पाहीले व ऐकले आहे.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॅारवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच बरोबर व खरे असल्याची खात्री झाली. पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या भावा विरुध्द दाखल असलेल्या 307 च्या गुन्हयामध्ये यापुर्वी तक्रारदार यांचेकडुन 01 लाख रुपये स्विकारलेचे मान्य करुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने तक्रारदार यांचेकडे 30 हजार रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 20 हजार रुपये लाच मागणी केल्याचे व सदर लाच रक्कम त्यांनी दिलेल्या खाकी कलरच्या पाकिटामध्ये एका पाकिटात पाच हजार व दुस-या पाकिटात 15 हजार रुपये आणुन देणेस तक्रारदार यांना सांगितलेचे निष्पन्न झाले. पडताळणी कारवाई दरम्यान आम्ही थांबुन असलेले ठिकाण गोपनीयतेच्या कारणास्तव बदलण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले व आम्ही सापळा पथक हे पुणे बाजुकडे हॉटेल

Scanned with CamScanner

शौर्यवाडा समोर असलेल्या संत तुकाराम महाराज मंदिरसमोर, वाकसाई येथुन सापळा कारवाई करण्याचे ठरवण्यात आले.

त्याप्रमाणे सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार श्री महेश पवार यांना लोकसेवक नाथा केकाण यांनी मागितलेली लाच रक्कम 20,000/- रूपये हजर करण्याबाबत सांगितले असता त्यांनी 20,000/- रूपये रेाख रक्कम त्यात भारतीय चलनातील 500 रू दराच्या 40 नोटा लाच रक्कम हजर केली. सदर नोटांचे नंबर अंमलदाराचे मदतीने पंचासमक्ष कागदावर लिहून कागदावर पंचानी व मी सही केली.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना सरकारी वाहनामध्येच अँथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे चालक पोहवा/सोनावणे यांनी सरकारी वाहनातच तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500 रु. दराच्या 40 नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन लोकसेवकाने पडताळणी दरम्यान सांगीतले प्रमाणे त्यांनी दिलेल्या एका खाकी पाकीटात 30 नोटा (15000रु) व दुस-या पाकीटात 10 नोटा (5000 रु.) असे दोन पाकीट तयार केले व दोन्ही खाकी पकिटाना अथ्रॅसीन पावडर लावुन लाचेची रक्कम असलेले दोन पाकीटे तक्रारदार यांचे पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिश्यात ठेवली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथकास सुचना देत असताना तक्रारदार पवार यांनी लोकसेवक केकाण यांचा फोन येत असल्याचे सांगितले.सदर फोन कॉल शासकिय व्हॉईस रेकॉर्डर वर रेकॉर्ड करावयाचा असलेने सदर फोन कॉल न उचलनेबाबत मी त्यांना सुचना दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9762262525 वरुन पीएसआय केकाण यांचा मोबाइ्ल क्रमांक 9421049623 वर कॉल केला व लाऊड स्पिकर ऑन केला सदर वेळी तात्काळ पोशि दिवेकर यांनी शासकिय रेकॉर्डर चालु केला ती वेळ 18.51 वा ची होती. सदर फोन वरील संभाषण दरम्यान लोकसेवक पीएसआय केकाण यांनी तक्रारदार यांना त्यांचा मुलगा पडला असुन ते पोलीस स्टेशन येथुन निघत असल्याने तक्रारदार यांना लाच रक्कम घेऊन तात्काळ पुणे मुंबई हाय वे वरील फुड कोर्ट येथे बोलावलेचे निष्पन्न झाले.त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सर्वाना पुन्हा सुचना देवुन त्यानंतर तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे मपोहवा/गोरे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिग केले ती वेळ 18.54 वा ची होती.

त्यानंतर मी पुन्हा सर्वाना सुचना देवुन पोशि/रवि दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री महेश पवार याचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. तक्रारदार श्री. महेश पवार व पंच क्र. 1 श्री.पराग जगताप यांना तक्रारदार यांचे स्कॉर्पीओ कार एम.एच. 14/एम.सी./4387 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय नाथा केकाण यांनी बोलावले प्रमाणे मॅप्रो गार्डन, फुड कोर्ट जवळ येथे भेटून लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले ती वेळ 19.04 वा ची होती व आम्ही, पंच क्रमांक 02 सापळा पथकातील अंमलदार असे सरकारी वाहनामध्ये बसुन संत तुकाराम महाराज मंदिराचे समोरुन तक्रारदार यांचे पाठीमागे फुड कोर्ट येथे रवाना झालो व फुड कोर्ट च्या अलीकडे थोडया अंतरावर शासकिय वाहन थांबवुन आजु बाजुचे परीसरात थांबुन राहीलो. सदर वेळी फुड कोर्ट पुणे मुंबई हाय वे रोडच्या पलीकडे एक चारचाकी वाहन थांबलेले व त्यामधुन सरकारी गणवेश परीधान केलेली व्यक्ती तक्रारदार यांचे वाहनाच्या दिशेन चालत येताना दिसली व तक्रारदार यांचे स्कॉर्पीओ कारच्या डाव्या बाजुस जावुन थांबले तेव्हा पंच क्र.01 हे गाडीतुन खाली उतरुन गाडी शेजारी 1 फुटावर थांबलेले व लोकसेवक पीएसआय केकाण हे तक्रारदार यांचे शेजारील सीट वर बसलेले दिसले. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार यांनी डोळ्यावर गॉगल लावुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला. त्यानंतर तात्काळ सदर ठिकाणी सापळा पथक पोहोचले तात्काळ पोशि रवि दिवेकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 19.14 वा ची होती. त्यानंतर यापुर्वी सुचना दिल्याप्रमाणे पो.अंम. मपोहवा गोरे यांनी लगेच व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यावेळी मी तक्रारदार यांना लाच रक्कमकबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी गाडी मध्ये बसलेल्या इसमाकडे इशारा करत ते लोकसेवक पीएसआय केकाण असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे डाव्या हातात घेऊन त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवल्याचे सांगीतले. पंच क्र.1 यांना विचारले असता त्यांनी सुध्दा लाच रक्कम हि लोकसेवक यांनी पॅन्टच्या डाव्या खिश्यात ठेवलेली असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी लोकसेवक पीएसआय केकाण यांचे दोन्ही हात पकडले व त्यांना ताब्यात घेतले ती वेळ 19.14 वा ची होती. त्यावेळी मी लोकसेवकपीएसआय केकाण यं◌ाना माझी ओळख सांगुन त्यांचेवर झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली. त्यानंतर मी लोकसेवक यांना त्यांचे नाव विचारले असता

Scanned with CamScanner

त्यांनी त्याचे नाव- नाथा रामकिसन केकाण, वय-38 वर्षे ,पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, रा.फ्लॅट नंबर 401, साई विजन, भोंडवे बाग, रावेत, पुणे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच क्र.2 संजय हस्तोलीया यांनी लोकसेवक नाथा केकाण यांचे पॅन्टचे डाव्या खिश्यातुन दोन पाकीटे असलेली लाच रक्कम बाहेर काढली ती पंचासमक्ष उघडून पाहीली असता त्यामध्ये एका खाकी पाकीटामध्ये 500 रूपये दाराच्या 30 नोटा व दुस-या खाकी रंगाच्या पाकीटमध्ये 500 रु.दराच्या 10 नोटा असे एकुण 40 चलनी नोटा 20,000/-रूपये अशी लाच रक्कम दिसुन आली. सदर लाच रकमेचे नोटांचे अंधारात अँल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता हस्तगत केलेल्या लाच रकमेच्या नोटांवर व दोन्ही खाकी पाकीटावर अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंच क्रमांक 02 यांचेकडे यापुर्वी देण्यात आलेल्या कागदावर लिहिलेल्या नोटांचे नबंर व लाच रकमेतील प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. तसेच पंच क्रमांक 02 यांचे हाताची पाहणी केली असता त्याचे दोन्ही हातावरचे तळव्यावर व बोटावर अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच सदर लोकसेवक पिएसआय केकाण यांचे हाताची तपासणी केली असता दोन्ही हाताच्या तळव्यावर व बोटांची अँल्ट्राव्हायलेट दिव्याने पाहणी केली असता अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली तसेच लोकसेवकाचे पॅन्टचे पुढील बाजुच्या डाव्या बाजुच्या खिश्याची अँल्ट्राव्हायलेट दिव्याने पाहणी केली असता अँथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिग करण्यात आलेले आहे. तसेच तक्रारदार यांचे उजवे हाताचे तळावर व बोटाचे पेरावर व पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिश्यावर अँथ्रॅसीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पंच क्रमांक 01 श्री पराग जगताप यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि, "ते व तक्रारदार महेश पवार असे तक्रारदार यांचे स्कॉर्पीओ कार एम.एच. 14/एम.सी./4387 मधुन मॅंप्रो गार्डन जवळ फुट कोर्ट जुना मुंबई पुणे हायवे येथे आलो असता तेथे रोडच्या उजव्या बाजुस लोकसेवक नाथा केकाण यांची किया सेल्टॉस कार उभी असल्याचे दिसली म्हणुन तक्रारदार यांनी त्यांची कार रोडच्या डाव्या बाजुस कडेला पार्क केली त्यानंतर लोकसेवक नाथा केकाण हे त्याचे किया सेल्टॉस कारमधुन उतरुन रोड क्रॉस करुन आम्ही बसलेल्या तक्रारदार यांचे कारचे डाव्याबाजुने पुढील बाजुस आले तेव्हा मी गाडीच्या खाली उतरलो व कारला लागुनच 1 फुटावर उभा राहिलो व त्यावेळी लोकसेवक पिएसआय नाथा केकाण यांनी गाडीचा दरवाजा अर्धवट उघडा ठेवुन ते तक्रारदार याचे स्कॉर्पीओ कारच्या पुढील बाजुस डाव्या सिटवर बसले त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक केकाण यांचेमध्ये होत असलेले संभाषण मी ऐकले व पाहिले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक केकाण यांना "काय झाल पोराला"? असे विचारले त्यावर लोकसेवक केकाण यांनी "पडल खाली पाय-यावरुन ,असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी "लय लागलय"? असे विचारले त्यावर लोकसेवक यांना केकाण हे "नाय ते डोक्याला लागलय थोडस त्याच्यामुळ अर्जट निघालो" असे म्हणाले.त्यानंतर लोकसेवक तक्रारदार यांना एवढ कशाला आणलंय" असे म्हणाले असता तक्रारदार यांनी "नाय नाय आओ काय झालंय मी सांगतो तुम्हाला नागेश कडे होते पैसे" असे म्हणाले त्यावर लोकसेवक हे "हा" असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये इतर चर्चा करुन तक्रारदार यांनी त्यांचे पँट च्या उजव्या खिशातील लाच रक्कम असलेली दोन्ही पाकीटे बाहेर काढुन लोकसेवक यांचे समोर धरुन "ठेवुन टाका , आलोच मी 5 मिनीटात आलो जाउन आ .." असे बोलले असता त्यावर लोकसेवक केकाण यांनी दोन खाकी पाकिटे आपल्या उजव्या हाताने स्विकारुन ती डाव्या हातात घेवुन त्यांनी त्यांचे पॅन्टचे पुढील बाजुचे डाव्या खिश्यामध्ये ठेवले ते मी पाहिले त्यानंतर तक्रारदार यांनी डोळ्यास गॉगल लावुन लाच रक्कम स्वीकारलेबाबात इशारा केला त्यानंतर सापळा पथक येवुन त्यांनी लोकसेवक पिएसआय केकाण याना ताब्यात घेतले" अशी हकिगत सांगितली.
त्यांनतर तक्रारदार श्री महेश पवार याना पंचसमक्ष रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी सुध्दा पंच क्र.01 श्री पराग जगताप यांचेप्रमाणेच मिळतीजुळती हकिगत सांगुन तक्रारदार यांनी सांगितले की,पंच हे गाडी जवळ लोकसेवक यांचे पासुन 01 फुट अंतरावर थांबले असल्याने व गाडीचा दरवाजा अर्धवट उघडा असल्याने पंचांनी आमचे मध्ये झालेले संभाषण पाहीले व ऐकले आहे.

त्यांनतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरेाबर आहे. सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे. व मेमरी कार्डच्या हॅश व्हॅल्यू घेण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner

तरी आरोपी लोकसेवक नाथा रामकिसन केकाण, वय-38 वर्षे ,पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, रा.फ्लॅट नंबर 401, साई विजन, भोंडवे बाग, रावेत, पुणे यांनी दिंनाक 16/11/2026 रोजी 17.20 ते 18.05 वा चे दरम्यान लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन येथे झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे भावाचे विरूध्द दाखल गुन्हयात चॅप्टर केस पाठविण्यात मदत करण्याकरीता व गुन्हयाचा तपास लवकरात लवकर पुर्ण करुन चार्जशिट लवकर सादर करणेकरीता स्वत: करिता 20,000/-रूपये लाचेची मागणी करून त्यांनी तक्रारदार यांना दोन खाकी पाकीटे देवुन एका पाकिटामध्ये 15,000 व दुस-या पाकीटामध्ये 5,000 रु. असे एकुण 20,000 दोन पाकिटामध्ये भरुन ते दिंनाक 16/11/2026 रोजीच स्वीकारण्याची तयारी दर्शविली व दिंनाक 16/11/2026 रेाजीच रक्कम घेवुन येण्याबाबत सांगितले. सापळा करवाई दरम्यान लोकसेवक यांनी 20,000/-रूपये (विस हजार रूपये) लाच रक्कम पंचासमक्ष तक्रारदार यांचे स्कॉर्पीओ कारमध्ये स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. लोकसेवक नाथा रामकिसन केकाण, वय-38 वर्षे ,पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे भावाचे विरूध्द दाखल गुन्हयात चॅप्टर केस पाठविण्यात मदत करण्याकरीता व गुन्हयाचा तपास लवकरात लवकर पुर्ण करुन चार्जशिट लवकर सादर करणेकरीता म्हणुन स्वत: करिता 20,000/-रूपये (विस हजार रूपये) लाच रक्कम मागणी करू.न ती स्वत: स्वीकारली. म्हणुन नाथा रामकिसन केकाण, वय-38 वर्षे ,पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोणावळा ग्रामिण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, रा.फ्लॅट नंबर 401, साई विजन, भोंडवे बाग, रावेत, पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील प्रथमखबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष फिर्याद लिहुन दिली, सही,

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

mahesh hanmant vidhate(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Scanned with CamScanner

पोलीस ठाणे अंमलदार
कोणतळा शहर पोलीस स्टेशन

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): mahesh hanmant vi
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with CamScanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with CamScanner